महाराष्ट्र टाइम्स मरिन ड्राइव्ह POINT

# महती नामदेवांची

डॉ. तुषार सावडावकर

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांचे समकालीन किंबहुना वयाने त्यांच्यापेक्षा पाच-सहा वर्षांनी मोठे संत म्हणजे नामदेव महाराज. पंढरपूरच्या विठ्ठलाचे परमभक्त आणि प्रासादिक अभंगकर्ते. विशेष म्हणजे संतशिरोमणी तुकाराम महाराज यांना अभंग रचण्याची प्रेरणा देणारे गुरुच. नामदेवांचा जन्म शके ११९२ (सन १२७०) मध्ये झाला. त्यांचे वडील दामाशेटी शिंपी (नरसी बामणी, जि. परभणी) हे पांडुरंगाचे मोठे भक्त होते. नामदेवांचं लग्न अकराव्या वर्षी गोविंदशेटी सदावर्ते यांच्या मुलीशी झालं. संसारात त्यांचं मन रमेना. ते सदासर्वदा विठ्ठलभक्तीत रमले होते. त्यांची आई गोणाई आणि पत्नी राजाबाई यांनी त्यांचं लक्ष संसाराकडे लागावं म्हणून पुष्कळ प्रयत्न केले. देवालासुद्धा साकडं घातलं. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यांच्यातली पारमार्थिक वृत्ती जागी झाली. इ. स. १२९१ मध्ये ते आळंदीला गेले. तिथे ज्ञानेश्वरांची आणि त्यांची भेट झाली. ज्ञानेश्वरांचं अलौकीक कर्तृत्व पाहून आपण त्यांच्यापुढे किती लहान आहोत याची त्यांना जाणीव झाली.

## देवळांच्या गावा...



*रकट्याची लंगोटी,*
*सुभांचा करदोटा,*
*नामा वाळवंटी,*
*कीर्तन करी!*

शके १२१२ नंतर नामदेव आणि ज्ञानेश्वरांची भेट झाली असावी. ज्ञानेश्वरांच्या कृपाप्रसादाने विसोबा खेचरांकडून नामदेवांना गुरुपदेश मिळाला आणि त्यांचं जीवन सार्थक झालं. ज्ञानदेव महाराजांच्या समाधीनंतर नामदेवांनी उत्तर हिंदुस्तानात जाऊन विठ्ठलभक्तीचा प्रसार केला. पंजाबात जवळजवळ १८ वर्षं त्यांचं वास्तव्य होतं. पंजाबात त्यांना 'बाबा नामदेव' या नावाने ओळखतात. तिथे त्यांचे अनेक शिष्यही आहेत. महाराष्ट्राबाहेर जाऊन विठ्ठलभक्तीचा प्रचार करणारे नामदेव हे पहिले प्रचारक होत. पंजाबातलं कार्य संपल्यावर नामदेव पंढरपूरला परत आले आणि उरलेलं आयुष्य विठ्ठलभक्तीत व्यतीत केलं.

नामदेवांचे २४०० अभंग उपलब्ध आहेत. आदि तीर्थावळी आणि समाधी या प्रकरणातून त्यांनी ज्ञानेश्वरांचं चरित्र रसाळपणे वर्णिलेलं आहे. बालक्रीडा या प्रकरणात श्रीकृष्णाच्या बाललीला प्रेमळपणे गायल्या आहेत. हिंदी भाषेतही त्यांनी पद्यरचना केली आहे. त्यातली काही पदं 'गुरुग्रंथसाहेब' या पवित्र ग्रंथात समाविष्ट केलेली आहेत. 'युगे अठ्ठावीस...' ही पांडुरंगाची लोकप्रिय आरती आणि कीर्तनाच्या शेवटी म्हटला जाणारा 'आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा! माझिया सकळा हरिच्या दासा' हा सुप्रसिद्ध अभंग नामदेवांचाच आहे.

असा हा श्रेष्ठ संतकवी वद्य १३ शके १२७२ म्हणजे सन १३५० रोजी पंढरपूर इथे श्रीविठ्ठल मंदिराच्या द्वारी समाधीस्त झाले. पंढरपुरातल्या त्यांच्या समाधीला 'नामदेवाची पायरी' असं म्हणतात. खाली वाकून तिला नमस्कार केल्यावर भाविकजन आत पांडुरंगाच्या दर्शनाला जातात. अशीच एक 'नामदेवाची पायरी' गिरगावामध्ये खेतवाडीत देशस्थ डोंगरीकर नामदेव शिंपी मंडळी यांनी बांधली आहे. नामदेव शिंपी समाजाची गिरगावसारख्या व्यापारी पेठेत कायमस्वरूपी वास्तू असावी म्हणून श्रीविठ्ठल-रुक्मिणी आणि नामदेवाची पायरी यांच्या सुंदर मंदिराची १८२५च्या आसपास स्थापना करण्यात आली. या मंदिरामध्ये श्रीविठ्ठल-रुक्मिणीच्या सुंदर आणि सुबक अशा पूर्वाभिमुख मूर्ती असून गाभाऱ्यामध्ये श्रीनामदेवांचा मुखबंध आणि समाधीची पायरी आहे. देवळाच्या दरवाजावर जय-विजयच्या मूर्ती आहेत. तसंच मंदिरामध्ये गणपती आणि दत्तगुरूंच्यादेखील मूर्ती असून मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळ मारुतीचं मंदिर आहे.

मंदिराच्या ट्रस्टतर्फे विविध धार्मिक कार्यक्रम साजरे केले जातात. संत शिरोमणी नामदेव महाराजांची पुण्यतिथीनिमित्तही विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यामध्ये सकाळी अभिषेक आणि दुपारी साडेबारा वाजता महाआरती होते. महाआरतीनंतर शिंपी समाजातल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ साजरा केला जातो. त्याचबरोबर भाविकांना महाप्रसादही दिला जातो. नामदेव सप्ताहामध्ये रोज संध्याकाळी भजनाचा कार्यक्रम होतो. नामसप्ताहाची सांगता अभिषेकाने केली जाते. त्याचबरोबर दत्तजयंती, आषाढी एकादशी, रामनवमी, हनुमान जयंती, श्रावण महिन्यात श्रीकृष्ण जन्म साजरा के ला जातो. दर रविवारी कलावतीआईंनी बाळगोपाळांसाठी रचलेल्या 'बालोपासने'चं पठण होतं.

*नाचू कीर्तनाचे रंगी*
*ज्ञानदीप लावू जगी*

हा नामदेवांचा संदेश या मंदिराच्या निमित्ताने सर्वजणांना पोहोचवण्याचं कार्य या ट्रस्टकडून चालतं.

mtartnedit@indiatimes.com